# जिल्ह्यात शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रम

**लातूर :** राजर्षी शाहू महाविद्यालय, क्विक हिल फाउंडेशन (पुणे) यांच्या वतीने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम लातूर जिल्ह्यात राबवला जात आहे. समाजात सायबर सुरक्षिततेची जाणीव वाढवणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करून त्यांना सायबर वॉरिअर्स म्हणून नियुक्त केले जात आहे. यावर्षी या उपक्रमांसाठी २० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. उपक्रमांतर्गत महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांची सायबर वॉरिअर्स म्हणून निवड केली जात आहे. हे विद्यार्थी लातूर शहर तसेच परिसरातील शाळा व महाविद्यालयांमध्ये जाऊन सायबर सुरक्षा कार्यशाळा घेत आहेत. कार्यशाळांमधून फिशिंग, डिजिटल अरेस्ट, आर्थिक फसवणूक, सोशल मिडियाद्वारे फोटो किंवा वैयक्तिक माहितीचा गैरवापर यांसारख्या सायबर गुन्ह्यांची माहिती विद्यार्थ्यांना देत आहेत. तसेच, अनोळखी मेसेजेस व लिंकवर क्लिक न करणे, वैयक्तिक माहिती शेअर न करणे, आणि अशा गुन्ह्यांची सायबर सेलमध्ये नोंदणी कशी करावी याची माहिती, १९३० या हेल्पलाइन क्रमांकाबद्दल जागरूकता निर्माण केली जात आहे. इंटरनेटच्या अतिवापरामुळे निर्माण होणारा मानसिक ताण व चिडचिडेपणा यासंदर्भातही मार्गदर्शन केले जात आहे. शाळा महाविद्यालयांमधून या उपक्रमाला प्रतिसाद मिळाला आहे. उपक्रमातील विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, अजय गायत्री केसकर, दिपू सिंह यांनी मार्गदर्शन केले.